८८

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९९९, २५५७७९००
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट :
www.srapune.gov.in

जा.क्र. झोपुप्रा/तां-१/भोप्र/मा.क्र.४१/४७०/२०२४
दि. २६/०२/२०२४

## अंतिम भोगवटा प्रमाणपत्र

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

वाचा - १) मूळ मंजूर बांधकाम परवानगी क्र.१८५३/२०१० दि.१०/१२/२०१०

२) सुधारित मंजूर बांधकाम परवानगी क्र.१२०३/२०२२, दि. २६/०८/२०२२

३) विकसक मे. क्वालिटी कन्स्ट्रक्शन्स यांचा भोगवटा प्रमाणपत्र मागणीचा दि.२३/१०/२०२३ चा प्रस्ताव.

---

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ ची कलमे २५३/२५४ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ प्रमाणे मौजे हडपसर, पुणे, स.नं.३१४ अ/४, अ+ब पैकी, सि.स.नं.१९३३ (पै), १९३४ ते १९४३, वैदुवाडी, कोकणे वस्ती येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील (पुनर्वसन + विक्री घटक) विंग C इमारतीस प्राधिकरणाकडून क्र. झोपुप्रा/नर/ मा.क्र.४१ /१२०३/२०२२, दि.२६/०८/२०२२ अन्वये बांधकाम परवानगी मंजूर करण्यात आली आहे. मंजूर बांधकाम परवानगीप्रमाणे संयुक्त विंग C इमारतीचे बांधकाम काम पूर्ण झाल्याने, भोगवटा पत्र मिळण्याबाबत प्रकल्पाचे विकसक मे. क्वालिटी कन्स्ट्रक्शन्स यांनी प्रस्ताव दाखल केला आहे. त्यानुसार संयुक्त विंग C इमारतीस अंतिम भोगवटा प्रमाणपत्र अदा करण्यात येत आहे.

पुनर्वसन + विक्री इमारत विंग C

| अ.क्र | मजले | सदनिका (पुनर्वसन घटक) | सदनिका (विक्री घटक) | एकूण सदनिका |
|---|---|---|---|---|
| १) | स्टिल्ट | पार्किंग | --- | पार्किंग |
| २) | पहिला | बालवाडी + सोशल वेलफेअर सेंटर | ०१ सदनिका | बालवाडी + सोशल वेलफेअर सेंटर + १ सदनिका |
| ३) | दुसरा | सदनिका क्र. २०१,२०२, २०३ | | ३ सदनिका |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४) | तिसरा | सदनिका क्र. ३०१,३०२, ३०३ | | ३ सदनिका |
| ५) | चौथा | सदनिका क्र. ४०१,४०२,४०३ | | ३ सदनिका |
| ६) | पाचवा | सदनिका क्र. ५०१,५०२,५०३ | | ३ सदनिका |
| ७) | सहावा | सदनिका क्र. ६०१,६०२,६०३ | | ३ सदनिका |
| ८) | सातवा | सदनिका क्र. ७०१,७०२, ७०३ | | ३ सदनिका |
| | | १८ सदनिका + १ बालवाडी + १ वेलफेअर सेंटर | १ सदनिका | १९ सदनिका |

i ) पुनर्वसन इमारत:- १८ सदनिका + १ वेलफेअर सेंटर + १ बालवाडी
ii) विक्री घटक इमारत :- १ सदनिका

एकूण :- १९ सदनिका + १ वेलफेअर सेंटर +१ बालवाडी

प्रस्तुत प्रकरणी अंतिम भोगवटा प्रमाणपत्र खालील नमूद अटी व शर्तींना अधीन राहून देणेत येत आहे.

अटी व शर्ती:-

१) प्रस्तुत अंतिम भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये वाढीव बांधकाम केल्याचे आढळून आल्यास सदर बांधकाम अनाधिकृत समजण्यात येईल आणि त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५२ ते ५६ नुसार कारवाई करण्यात येईल.

२) अंतिम भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रे चुकीची खोटी अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात आढळून आल्यास दिलेले भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

४) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

५) इमारतीचे सर्व बाजूंनी असणारे सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal open space) कायम खुले ठेवणे बंधनकारक आहे.

६) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

७) विषयांकित योजना रस्तारुंदीकरणाखालील / आरक्षणाखालील क्षेत्र असल्यास संबंधित पुणे महानगरपालिकेस हस्तांतरीत करून तसे, अंतिम टप्प्यातील टी.डी.आर. मागणीपूर्वी, या कार्यालयास अवगत करावे.

८) विंग C मधील प्रस्तावित १८ पुनर्वसन सदनिका वाटपाबाबत निर्णय होईपर्यंत इमारतीमधील पुर्ण झालेल्या सदनिकांच्या सुरक्षेची जबाबदारी विकसकावर राहील.

{ मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे
दि. / /२०२४ रोजीचे मान्यतेने }

प्रभारी सहायक संचालक नगररचना,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे

प्रत :- १. विकसक मे. क्वालिटी कन्स्ट्रक्शन्स
१७०८, पहिला मजला, वजिर चेंबर्स बिल्डिंग, बाबाजान चौक, कॅम्प, पुणे-४११००१.
२.वास्तुविशारद एट्रियम डिझाइन स्टुडिओ.
C.T.S. ४३३/४, पहिला मजला, सारस्वत हाऊसिंग सोसायटी, सोमवार पेठ, पुणे.
३. तहसिलदार,ताबा विभाग, झोपुप्रा, पुणे, यांना माहितीस्तव सादर.

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area